सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०६ | मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# खानदेश शिक्षण मंडळ त्रैवार्षिक निवडणूक निकाल

## अध्यक्ष



| | | |
|---|---|---|
| १) | विनोद जगदीश अग्रवाल | ११३० |
| २) | डॉ. रविंद्र काशिनाथ कुळकर्णी | २४१ |
| ३) | विक्रम बिपीनचंद शाह | १४२ |
| ४) | विजय जगन्नाथ बोरसे | २७७ |
| ५) | लालचंद हेमनदास सैनानी | १०४९ |
| ६) | राकेश गिरधरलाल माहेश्वरी | २२७ |
| ७) | अक्षय नंदकिशोर अग्रवाल | २७६ |

## उपाध्यक्ष

१



२



| | | |
|---|---|---|
| १) | कोचर कमल आसकरण | १८८८ |
| २) | माधुरी प्रमोद पाटील | १८५६ |
| ३) | सचिन बुधा पाटील | ११९४ |

## विश्वस्त


१



| | | |
|---|---|---|
| १) | वसुंधरा दशरथ लांडगे | २१४६ |
| ३) | पुरुषोत्तम वसंत शेटे | ११४६ |

## कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी

१



२



३



४



५



६



७



८



| | | |
|---|---|---|
| १) | पंकज गोविंद मुंदडे | २१६२ |
| २) | प्रदीप कुंदनलाल अग्रवाल | १७१७ |
| ३) | हरी भिका वाणी | १६८० |
| ४) | योगेश मधुसूदन मुंदडे | १६७५ |
| ५) | लिना प्रविण पाटील | १५९७ |
| ६) | निरज दीपचंद अग्रवाल | १५९० |
| ७) | जितेंद्र मोहनलाल जैन | १५४४ |
| ८) | डॉ.संदेश बिपीन गुजराथी | १४७१ |
| ९) | डॉ.अनिल नथ्थु शिंदे | १४६२ |
| १०) | कल्याण साहेबराव पाटील | १४५९ |
| ११) | जितेंद्र शांतीलाल झाबक | १३३८ |
| १२) | प्रविण रामलाल जैन | ११८७ |
| १३) | दिलीप हरकचंद जैन | १०१३ |
| १४) | प्रसाद रमेशचंद्र शर्मा | ७३५ |
| १५) | डॉ.अविनाश रघुराज जोशी | ६४८ |
| १६) | निशांत राजेंद्र अग्रवाल | २८४ |
| १७) | संतोष बाबुराव पाटील | २८२ |

दै.ग्लोबल महातेज वृत्तसेवा / https://epaper.globalmahatej.com/

**अमळनेर : कल्याण पाटील व डॉ. अनिल शिंदे या अगदी थोड्या मतांनी पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यावरून पुर्नमतमोजणी प्रक्रिया रात्री ९ वाजेनंतर सुरू झाली. रात्री उशिरापर्यंत अंतीम व सर्वमान्य निकाल येण्याची चिन्हे होती. त्यामुळे सदर अंतीम निकाल आजच्या अंकात वेळेअभावी देणे शक्य झाले नाही. त्याबाबत बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी वृत्त प्रसिद्ध करण्यात येईल.**

### प्रताप शेठजींनंतर विनोद अग्रवाल



खानदेश शिक्षण मंडळाच्या कार्यकारिणीवर वर्षानुवर्ष अग्रवाल समाजाचे एक- दोन मान्यवर संचालकपदी विजयी होत होते व होत आहेत. मात्र, ज्यांच्या भरीव आर्थिक योगदानामुळे खानदेश शिक्षण मंडळाचा शैक्षणिक वटवृक्ष प्रचंड फोफावला व राज्यभर लौकिकप्राप्त झाला त्या दानशूर (स्व.) प्रताप शेठजी यांच्यानंतर संस्थेच्या अध्यक्षपदी दीर्घकाळानंतर विनोद अग्रवाल यांच्या निमित्ताने दुसऱ्यांदाच अग्रवाल समाजाची व्यक्ती अध्यक्षपदी विराजमान झाली आहे, हे विशेष !

### सौ. लीनाताई पाटील दुसऱ्या संचालिका



खानदेश शिक्षण मंडळाच्या आतापर्यंतच्या इतिहासात (स्व.) मनप्रितकौर भगवंतसिंग कालरा याच एकमेव संचालिका विजयी झाल्या होत्या. सौ. लिनाताई पाटील यांच्या निमित्ताने आता दुसऱ्यांदा एका महिलेची संचालिकापदी निवड झाली आहे.

### सौ. वसुंधराताई लांडगे चौथ्यांदा विश्वस्त



खानदेश शिक्षण मंडळाच्या इतिहासात सलग चौथ्यांदा आणि त्यातही महिलेने विश्वस्तपदी विजयी होणे ही लौकिकमय तथा रेकॉर्ड ब्रेक करणारी घटना सौ. वसुंधराताई लांडगे यांच्या निमित्ताने घडली आहे. स्वतः निवृत्त शिक्षिका असलेल्या, कोणीही गॉड फादर नसलेल्या अत्यंत सामान्य कुटुंबातील असूनही त्यांनी संपादित केलेले हे यश विशेष मानले जाते. त्या अर्बन बँकेतही सातत्याने संचालिकापदी विजयी होत आहेत. मराठी वाङमय मंडळातही त्या निवडून येतात.



*अमळनेर : अंगारक संकष्ट चतुर्थीच्या निमित्त सजलेले श्री मंगळ ग्रह मंदिर.*

*(छायाचित्र : नितेश बारी)*

### महेंद्र रामोशे यांची तज्ञसंचालकपदी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील साने गुरुजी विद्या मंदिर शाळेचे उपशिक्षक महेंद्र रामोशे जळगाव जिल्हा खाजगी प्राथमिक शाळा कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञसंचालकपदी निवड झाली आहे. जळगाव येथील पतसंस्थेच्या कार्यालयात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळ उपस्थित होते. भुसावळ येथील तू. स. झोपे गुरुजी विद्यालयाचे उपशिक्षक मोहन कौतिक पालवे यांचीही तज्ञ संचालकपदी निवड झाली आहे. श्री. रामोशे व श्री. पालवे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.


### मेरी पंचायत ॲपद्वारे एका क्लिकवर माहिती

अमळनेर : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात पारदर्शकता यावी यासाठी केंद्रसरकारच्या पंचायत राज मंत्रालयाने मेरी पंचायत ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून ग्रामस्थांना पंचायतीचा कारभार घरबसल्या एका क्लिकवर समजणार आहे. केंद्र तसेच राज्य शासनाकडून ग्रामपंचायती अधिक बळकट करण्यावर भर दिला जात आहे.

## अमळनेर महसूल आवारात वाळू जप्तीची वाहनेच झाली कचरा कुंड्या

### दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव; महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष






*अमळनेर : तहसील आवारात वाळू जप्तीच्या ट्रॅक्टरमध्ये साचलेला कचरा.* *(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महसूल विभागाने अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने जप्त करून तहसील आवारात लावली आहेत. मात्र, या वाहनांचा वापर सर्रास कचरा कुंडी म्हणून होऊ लागला आहे. तहसील आवाराची अस्वच्छतेमुळे दयनीय अवस्था झाली आहे. डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. दुर्गंधीने नागरिक त्रस्त झाले आहेत. याकडे महसूल प्रशासनाचे दूर्लक्ष आहे.

ट्रॅक्टर- ट्रॉली व इतर जप्तीच्या वाहनांमध्ये कचरा टाकला जात आहे. पालापाचोळा, प्लास्टिक पिशव्या, रिकाम्या बाटल्या, कागद, थर्माकोल व इतर टाकाऊ साहित्य दिसून आले. त्यामुळे संपूर्ण परिसरात दूर्गंधी पसरली आहे. तहसील कार्यालयात विविध कामांसाठी येणारे शेतकरी, नागरिक, महिला व वृद्धांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कचऱ्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून कर्मचाऱ्यांसह नागरिकांच्या आरोग्यास धोका आहे.

विशेष म्हणजे या वाहनांचा अशा पद्धतीने गैरवापर सुरू आहे. या निष्काळजीपणाबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे. परिसराची नियमित स्वच्छता राखावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.



पत्रकार दिन विशेष

# समाजाचा आरसा : पत्रकारिता आणि पत्रकारांचे सामाजिक दायित्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. आधुनिक मराठी पत्रकारितेचे जनक, ‘ दर्पण ’कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस पत्रकारांच्या कार्याचा, त्यांच्या जबाबदाऱ्यांचा आणि समाजातील भूमिकेचा गौरव करण्यासाठी समर्पित आहे. पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून ती लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाते. समाजाला दिशा देण्याचे, सत्य समोर आणण्याचे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्रकारितेमार्फत घडते.

**पत्रकारिता : लोकशाहीचा कणा**

लोकशाही व्यवस्थेत शासन, न्यायपालिका आणि विधिमंडळ यांच्याबरोबरच पत्रकारिता ही एक प्रभावी शक्ती आहे. सामान्य जनतेपर्यंत सत्य, निष्पक्ष आणि अचूक माहिती पोहोचवणे हे पत्रकारितेचे मूलभूत कर्तव्य आहे. भ्रष्टाचार, अन्याय, शोषण आणि सामाजिक विसंगती यांचा पर्दाफाश करून प्रशासनाला जाब विचारण्याचे कार्य पत्रकार सातत्याने करत असतात. त्यामुळेच पत्रकारितेला ‘ समाजाचा आरसा ’ म्हटले जाते.

**बदलत्या काळातील पत्रकारितेची वाटचाल**

एकेकाळी छापील माध्यमांपुरती मर्यादित असलेली पत्रकारिता आज डिजिटल, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिक व्यापक झाली आहे. माहिती क्षणात लोकांपर्यंत पोहोचते, ही जशी पत्रकारितेची ताकद आहे, तशीच ती एक मोठी जबाबदारीही आहे. अफवा, चुकीची माहिती आणि सनसनाटी बातम्यांचा धोका वाढलेल्या या काळात सत्याची पडताळणी करूनच बातमी प्रसिद्ध करणे, हे आजच्या पत्रकारांसमोरील मोठे आव्हान आहे.



दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे
‘ दर्पण ’कार
बाळशास्त्री जांभेकर
यांना
विनम्रतापूर्वक अभिवादन...!

**पत्रकारांचे सामाजिक दायित्व**

पत्रकार हा समाजाचा सजग पहारेकरी असतो. समाजातील दुर्बल, उपेक्षित आणि वंचित घटकांचे प्रश्न मांडणे, त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणे हे पत्रकारितेचे खरे सामर्थ्य आहे. केवळ बातमी देणे नव्हे, तर समाजमन जागृत करणे, लोकशिक्षण घडवणे आणि सकारात्मक बदलासाठी प्रेरणा देणे हेही पत्रकाराचे कर्तव्य आहे.

**आव्हाने आणि संघर्ष**

सत्य मांडताना अनेकदा पत्रकारांना दबाव, धमक्या, आर्थिक अडचणी आणि असुरक्षिततेला सामोरे जावे लागते. तरीही निर्भीडपणे सत्याची बाजू मांडणारे पत्रकार समाजासाठी आदर्श ठरतात. पत्रकारितेतील मूल्ये सत्य, निष्ठा, निष्पक्षता आणि सामाजिक बांधिलकी जपणे ही काळाची गरज आहे.

**पत्रकार दिनाचे महत्त्व**

पत्रकार दिन हा केवळ अभिनंदनाचा दिवस नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. पत्रकारितेची मूल्ये किती जपली जात आहेत, समाजाप्रती आपली जबाबदारी आपण कितपत पार पाडतो आहोत, याचा विचार करण्याची ही योग्य वेळ आहे. नव्या पिढीतील पत्रकारांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत मूल्याधिष्ठित पत्रकारितेची परंपरा पुढे नेणे अपेक्षित आहे. समाज प्रगत, सुसंस्कृत आणि लोकशाही मूल्यांवर आधारित ठेवण्यात पत्रकारितेची भूमिका अत्यंत मोलाची आहे. सत्यासाठी लढणारा, समाजहित जपणारा आणि निर्भीडपणे प्रश्न विचारणारा पत्रकार हाच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा रक्षक आहे. पत्रकार दिनानिमित्त सर्व पत्रकारांना मनःपूर्वक शुभेच्छा देताना, त्यांच्या कार्याला सलाम करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

# राष्ट्रशाहीर : सिद्राम बसाप्पा मुचाटे

## जयंती विशेष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खानदेशातील शाहिरी परंपरेचा इतिहास जाणून घेताना प्रामुख्याने खानदेशातील शाहिरी परंपरेतील दीपस्तंभ राष्ट्रशाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचेच नाव सर्वप्रथम व अभिमानाने घ्यावे लागेल. स्वातंत्र्यलढ्यासाठी ज्यांनी आपली लेखणी झिजवली आणि इंग्रजांवर कडक शब्दांचे कोरडे ओढले. आपणही स्वातंत्र्य संग्रामासाठी वाटा उचलावा, ही कर्तव्य भावना मनात बाळगून स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून दिले. खानदेशात आपल्या शाहिरी लेखणीने इंग्रजांविरुद्ध प्रखर बंड करणारा खानदेशातील क्रांतीशाहीर, राष्ट्रशाहीर सिंद्राम बसाप्पा मुचाटे. ५ जानेवारी रोजी त्यांची जयंती सर्वत्र साजरी केली जाते. खानदेशाची जन्मभूमी व उभा महाराष्ट्र कर्मभूमी असणाऱ्या या प्रतिभावंत शाहिराचा जन्म ५ जानेवारी १९०८ मध्ये धुळे येथील माधवपुरा, गल्ली नं. ५ येथे झाला. वडील बसाप्पा यांचे सिद्राम यांच्या बालपणीच निधन झाले. संसाराचा गाडा आई टिपाबाई यांनी भाजीपाला विकत ओढला. सिद्राम यांचे शिक्षण केले. सिद्राम मराठी सातवी पास, तर इंग्रजी चौथीपर्यंत शिकले. चित्रकला, मूर्तिकला, गायनात निपुण असणाऱ्या सिद्राम बालपणापासूनच देशभक्ती राष्ट्रवीरांची कवने रचून गावू लागले. पत्नी यमुनाबाई व तीन मुली सुशीला, कमल आणि विमल असा परिवार. महात्मा गांधी, साने गुरुजी यांच्या विचाराने प्रेरित होऊन स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. १९३० ला म्हणजेच वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी जंगल सत्याग्रहात सहभागी होत रान उठविले. लळिंगच्या जंगलात सत्याग्रहांमध्ये त्यांनी ‘ काय सांगू मर्दा मी गमतीला/जंगलाचा कायदा मी काय मोडीला..! या स्फूर्तीकाव्याने तेथील सत्याग्रहींमध्ये व जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्याचे फलित म्हणून त्यांना इंग्रज सरकारने सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली. १९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतल्याबद्दल पुन्हा सहा महिने कारावास, तर १९४२ च्या चले जाव आंदोलनात त्यांना सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला. तर १९४२ मधे भूमिगत चळवळीमध्ये धुळे जिल्ह्यातील चिमठाणे येथील इंग्रज सरकारचा पाच लाख रुपयांचा खजिना लुटण्यासाठी आखलेल्या गनिमी काव्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता.

आपल्या स्फूर्तिगीतांनी इंग्रजांविरुद्ध जनक्षोभ निर्माण करणाऱ्या या शाहिराचा पोवाडा विशेष गाजला तो झाशीच्या राणीचा... मर्दानी झाशीची राणी जिने पालथे पाडून पाजले इंग्रजांना पाणी ...! अशी शाहिरी गर्जना करत ज्यांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले शाहीर मुचाटे यांचे अंतःकरण देशाभिमानाने भरलेले होते. साध्या सरळ पण रसपरिपोष करणाऱ्या भाषेत या राष्ट्रपुरुषांचे शाहीर मुचाटे यांनी गायलेले हे पोवाडे म्हणजे, त्या-त्या राष्ट्रपुरुषांची जीवंत स्मारके जणू बनली आहेत.

शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. सावध नजर, सरळ नाक, उंच शिडशिडीत बांधा, रुबाबदार सुरवार – शेरवानी, डोक्याला जरीचा भारदस्त कोल्हापुरी फेटा, छातीवर दोन्ही बाजूला कॅप्टन सारखे त्यांना मिळालेली सन्मानाची पदके लावून कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच श्रोत्यांवर जबरदस्त पकड घ्यायचे.

आपल्या अवघ्या ३७ वर्षांच्या छोट्याशा आयुष्यात त्यांनी केलेली विपुल आणि विविध विषयावरील काव्यरचना पाहून मन थक्क होऊन जाते. छत्रपती शिवाजी महाराज, अफजलखानाचा वध, बाजीप्रभू, तानाजी मालुसरे, झाशीची राणी, चित्तूरची राणी चन्नम्मा, बापू गोखले, महाराणा प्रताप, पृथ्वीराज चव्हाण, उमाजी नाईक, तंट्या भिल, महादजी शिंदे, महात्मा बसवेश्वर, बाबू गेनू, हुतात्मा भगतसिंग, हुतात्मा शिरीष कुमार, मल्लप्पा धनशेट्टी, महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाष चंद्र बोस, असे ऐतिहासिक आणि राष्ट्रीय पुरुषांचे ३२ पोवाडे असंख्य स्वातंत्र्य गीते राष्ट्रगीते लावण्या अंधश्रद्धेवर प्रहार करणाऱ्या बुवाबाजीवर अनेक काव्यरचना अशी प्रचंड साहित्य निर्मिती शाहीर मुचाटे यांनी अत्यंत अल्पकाळात केली. त्यांच्या अंगी शीघ्रकवित्वाचा गुण असल्यामुळे त्यांची पदे आणि लावण्यांची तर गणतीच करणे कठीण आहे.

अशा या महान शाहिराचे जीवनकार्य स्वातंत्र्याचा सूर्य उगवण्यापूर्वीच मावळले. पायाला भिंगरी बांधून उभ्या महाराष्ट्रात शाहीर मुचाटे यांचा इंग्रजांच्या विरुद्धचा प्रखर लढा देत करीत असलेला प्रचार दौरा त्यांच्या तब्येतीला मानवला नाही. त्यात आर्थिक परिस्थितीशी झंज, प्रवासाची दगदग, जागरणे, या सर्व गोष्टी प्रकृतीला हानिकारक ठरल्या त्यांना क्षयरोग झाला. त्यांच्या या आजारपणाच्या काळात मदत करण्यासाठी पूज्य साने गुरुजी यांनी जाहीर कार्यक्रमात झोळी फिरवून निधी जमा केला. मात्र, पत्नी यमुनाबाई व कमल आणि विमल या दोन गोड मुलींना सोडून शाहीर मुचाटे ३१ डिसेंबर १९४५मध्ये अनंतात विलीन झाले.

खरेतर देशाच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्ध प्रखर लढा देणारा खानदेशातील हा महान शाहीर शासनाच्या व जनमानसाच्या विस्मृतीत गेला आहे. शाहीर मुचाटे जीवनकार्य त्यांनी शाहिरी कार्याबद्दल मिळालेली विविध पदके, शाहिरी कार्यक्रमात वापरलेले डफ तुणतुणे व त्यांच्या विविध आठवणी असा अमुल्य ठेवा खानदेशकवी नागेश मोगलाईकर यांनी धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळाकडे सुपूर्द केला आहे. खानदेशातील या महान शाहिराचा ऐतिहासिक ठेवा तिचे जतन व संवर्धन करण्याचे कार्य धुळ्यातील राजवाडे संशोधन मंडळ करीत आहे.

खानदेशकवी नागेश मोगलाईकर, लोककलेचे अभ्यासक पत्रकार दलितमित्र गोविंदराव वामनराव गोराडकर, डॉ. बी. एम. डोळे, डॉ. विनोद गोराडकर तसेच जळगावच्या अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेने शाहीर मुचाटे यांचे जीवनकार्य येणाऱ्या नवीन पिढीला कळावे या साठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शाहीर मुचाटे यांनी इंग्रजांविरुद्ध लढलेला लढा, त्यांनी स्वरचित निर्माण केलेले अनेक पोवाडे. काव्य, स्वातंत्र्य गिते व त्यांच्या झंझावाती सादरीकरणाने महाराष्ट्रातील आनेक नामवंत शाहिरांनी शाहीर मुचाटे यांना गुरुस्थानी ठेऊन त्यांचे शिष्यत्व स्वीकारून आपल्या शाहीरी कार्याला सुरूवात केली. स्व. पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांनी आपल्या शाहिरीचा प्रारंभ शाहीर मुचाटे यांच्या पथकातूनच केला होता. शाहीर किसनराव हिंगे, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर गिरजूपंत ग्यानूजी येळमामे, शाहीर श्रीपतराव लोखंडे, चाळीसगावचे बापूराव घोटेकर, शाहीर बाबूराव धुळेकर, धुळे येथील शाहीर पांडुरंग गोविंद हेकरे, शाहीर लक्ष्मण साठे, शाहीर शंकर महादू मोगल, शाहीर रामचंद्र गोविंद पावसकर, शाहीर भाऊ पाटील यांनी शाहीर मुचाटे यांचा शाहीर परंपरेचा वारसा देशाच्या स्वातंत्र्यानंतर ही जोमाने सुरू ठेवला.

खानदेशातील या महान शाहिराला दै. ग्लोबल महातेज परिवातर्फे भावपूर्ण विनम्र अभिवादन..!

– विनोद ढगे, प्रमुख कार्यवाह, अखिल भारतीय मराठी शाहीर परिषद मध्यवर्ती संस्था मुंबई.

# देश का पहला शहर कौन सा, जहां नलों से घरों तक पहुंचा पानी

## काम कठिन था, १४० साल पुरानी कहानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इंदौर में पीने के नलों में दूषित पानी से आने से ९ लोगों की मृत्यु हो चुकी है। इस शहर में १२० साल पहले पानी पाइपलाइनों से जरिए घरों तक पहुंचाया गया था। क्या आपको मालूम है कि देश में वो पहला शहर कौन सा है, जहां सबसे पहले नदी से साफ पानी शहर तक लाने के लिए पाइपलाइन बिछाई गई. फिर इस पानी को नलों से घर घर तक पहुंचाया गया।

प्रामाणिक स्रोत कहते हैं कि इंदौर में पाइपलाइन और नलों के माध्यम से पानी सबसे पहले १९०६ में घरों तक पहुंचा था। यानि इसको १२० साल हो गए। अब इंदौर दूषित पेयजल को लेकर खबरों में है। इससे ९ लोगों की मृत्यु हो चुकी है. क्या आपको मालूम है कि देश में सबसे पहले किस शहर में घर घर तक पीने का पानी पहुंचाने के लिए पाइप लाइन बिछाई गई थी और नल का संजाल बिछाया गया था।

ये पुणे शहर था। जहां के लोग फख्र करते हैं कि उनके शहर में सबसे पहले पाइपलाइन और नलों के जरिए लोगों के घरों तक पानी पहुंचा। हालांकि उस समय ऐसा होना किसी सपने जैसा ही था। आखिर वो क्या बात थी, जिसकी वजह से अंग्रेजों ने पुणे को नलों का संजाल बनाने वाले पहले शहर के तौर पर चुना। वहां १४० साल पहले नलों से घरों तक पानी पहुंचाया गया। जिससे लोगों को नदियों, तालाबों और कुंओं से जाकर पानी भरकर लाने के मुश्किल काम से निजात मिली।

भारत में पुणे पहला शहर था, जहां नल से साफ पानी घरों तक पहुंचा। आज बेशक घरों में नल की टोंटी खोलते ही पानी आना एक साधारण काम लगता हो लेकिन कभी इसके बारे में सोचा भी नहीं जा सकता था। उन्नीसवीं सदी के आखिर में ये एक क्रांतिकारी बदलाव था. आखिर क्यों ब्रिटिश राज के लोगों ने पुणे को ही नल के पानी पहुंचाने के लिए पहले शहर के तौर पर चुना।

अंग्रेज़ों के आने से पहले पुणे का पानी मुख्य रूप से कुओं, बावड़ियों और तालाबों से आता था। बरसात में पानी खराब यानि प्रदूषित हो जाता था। ये गंदा पानी रोग फैलाने वाला साबित होता। तब हैज़ा, टाइफॉयड और डायरिया जैसी बीमारियां आम थीं।

**तब पुणे कैंट में प्रदूषित पानी से होने लगीं बीमारियां**

१८१७ में जब पुणे पर ब्रिटिशों का अधिकार हुआ और यहां कैंटोनमेंट बना, तो समस्या गंभीर हो गई। हज़ारों सैनिकों और उनके परिवारों को साफ पानी चाहिए था। कुओं और तालाबों पर निर्भर रहना मुश्किल था। कैंट एरिया में रहने वाले अंग्रेज अफसरों, सैनिकों और उनके परिवारों में पानी से संबंधित बीमारियां आम होने लगीं। इससे उन्हें बहुत दिक्कत होती थी। १९ वीं सदी में पुणे शिक्षा, प्रशासन और सैन्य गतिविधियों का बड़ा केंद्र बन चुका था। यहां भारतीय एलीट वर्ग और ब्रिटिश अफ़सर दोनों बसते थे, जिन्हें आधुनिक सुविधाएं चाहिए थीं।

**बनी पाइप लाइन से साफ पानी पहुंचाने की योजना**

इसके बाद ये सोचा जाना लगा कि आखिर कैंटोनमेंट तक साफ पानी कैसे पहुंचाया जाए। इसके बाद अंग्रेज ये सोचने लगे कि क्या पाइप लाइन के जरिए वहां तक साफ पानी भेजा जा सकता है, क्योंकि अंग्रेज ये काम इंग्लैंड में बखूबी कर चुके थे।

इसके चलते ब्रिटिश इंजीनियरों ने १८७० ये योजना बनाई कि कैसे पानी पुणे कैंटोनमेंट तक पाइपलाइन से लाया जाए। इसके पहले चरण में बांध बनाना था, जहां पानी को स्टोर कर सकें। फिर इसके बाद पाइपलाइन के जरिए इसको शहर तक पहुंचाया जाए।

१८७३ में मुठा नदीं पर बांध का काम शुरू हुआ। १८७९ तक खडकवासला डैम तैयार हो गया। इसे बनाने में करीब ६ साल लगे। यह बांध उस समय के लिए इंजीनियरिंग का अजूबा था। पत्थर और चूना-गारे से बनी विशाल दीवार ने पानी को रोका। बांध की लागत करीब ५० लाख रुपये आई, जो उस जमाने के हिसाब से एक बहुत बड़ी रकम थी।

**पानी २० किलोमीटर दूर पाइप लाइन से लाना था**

बांध बनने के बाद असली चुनौती शुरू हुई कि पानी को वहां से २० किलोमीटर दूर पुणे शहर तक कैसे पहुंचाया जाए। इंजीनियर कर्नल आर.एस. कैपल और जे.एच.सी. फिंडक्के को यह काम दिया गया।

**यह परियोजना भारत में पहली बार ‘** ग्रेविटी बेस्ड ’ पाइपलाइन सिस्टम का उदाहरण बनी। यानी ऊंचाई से नीचे की ओर पानी अपने दबाव से बहकर घरों तक पहुंचता था। उस समय भारत में इतनी मज़बूत पाइपें नहीं बनती थीं। इसलिए लंदन से भारी लोहे की पाइपें मंगाई गईं। इन्हें समुद्र के रास्ते बंबई (मुंबई) और वहां से बैलगाड़ियों के जरिये पुणे तक लाना पड़ा।

**पाइप बिछाना आसान नहीं था**

खडकवासला से पुणे तक का इलाका टेढ़ा-मेढ़ा और ऊबड़-खाबड़ था। वहां पाइप बिछाना आसान नहीं था। कई जगह चट्टानें काटनी पड़ीं। जो मजदूर इस काम में लगाए गए, उन्हें गर्मी, बीमारियाँ और भारी काम की वजह से काफी दिक्कतें हुईं। वो बार बार बीमार पड़ते। कई मजदूरों की मौत भी हुई। लगातार कठिनाइयों के बावजूद इंजीनियरों ने १८८० के दशक की शुरुआत तक यह काम पूरा कर लिया।

**और फिर पानी नलों से घरों तक पहुंचा**

जब पहली बार पानी पाइप से लोगों के घरों और सार्वजनिक नलों तक पहुंचा, तो शहर में उत्साह और आश्चर्य दोनों देखने को मिले. अमीर और पढ़े-लिखे पुणे वासी इसे आधुनिक सुविधा मानकर बहुत खुश हुए। उनके लिए ये यूरोप जैसा अनुभव था।

**परंपरावादियों और ब्राह्मणों ने विरोध किया**

गरीब तबके और परंपरावादियों ने जरूर में इसका विरोध किया, क्योंकि उनमें इसे लेकर शुरू में अविश्वास था। कुछ लोगों को डर था कि पाइप का पानी अपवित्र है, क्योंकि उन्हें नहीं पता था कि यह पानी कहां से आता है। कई ब्राह्मण परिवारों ने शुरू में पाइप का पानी पीने से मना कर दिया। अपने कुओं से ही पानी लाने पर जोर दिया।

**नल का पानी पुणे के गर्व का प्रतीक बन गया**

इस पाइप लाइन से जब पानी आने लगा तो बीमारियां कम होने लगीं। ये पानी की सुविधा भी आसान थी। लोगों ने इसे स्वीकार कर लिया। कहा जाता है कि १८९० के दशक तक पुणे में नल से पानी आना गर्व और प्रतिष्ठा का प्रतीक बन गया। आमतौर पर १८८६ में पुणे में लोगों के घरों तक पाइपलाइन से पानी पहुंचने लगा।



**पुणे बना भारत का ‘आधुनिक पानी’ वाला पहला शहर**

शुरू में यह सुविधा केवल कैंटोनमेंट, ब्रिटिश बंगलों और चुनिंदा अमीर भारतीय परिवारों तक सीमित थी। बाद में नगरपालिकाओं ने धीरे-धीरे आम नागरिकों के मोहल्लों में भी नल लगा। इस बदलाव का असर काफी बेहतर रहा। हैज़ा और टाइफॉयड के प्रकोप घटने लगा । लोगों का समय और मेहनत बची। खासकर महिलाओं का जो कुओं से पानी भरने जाती थीं. पुणे को ‘भारत का पहला आधुनिक पानी वाला शहर’ कहकर पहचाना जाने लगा ।

**फिर ऐसे प्रोजेक्ट दूसरे शहरों के लिए शुरू हुए**

इसके बाद मुंबई, मद्रास और कलकत्ता में भी इसी तरह की परियोजनाएं शुरू हुईं । वहां भी नलों के जरिए घरों तक पानी पहुंचाया गया । कहा जाता है कि जब पहली बार शहर में सार्वजनिक नल खोला गया, तो लोग घंटों तक वहां खड़े होकर पानी की धार को निहारते रहे । कई बच्चों ने पाइप से निकलते पानी को देखकर तालियां बजाईं । उस समय के समाचार पत्रों ने इस घटना को “भारत की आधुनिकता की ओर पहला कदम” बताया ।

**रोमन साम्राज्य में अमीरों के घर यूं पहुंचता था पानी**

रोमन साम्राज्य के दौरान रोम और अन्य रोमन शहरों में एक्वाडक्ट्स से पानी लाकर पत्थर और सीसे की पाइपों के जरिये अमीर घरों और सार्वजनिक स्नानगृहों तक पहुंचाया जाता था । कई घरों में नल जैसी कांस्य की फिटिंग्स लगी थीं ।


**लंदन में लगा था पहला आधुनिक पाइपलाइन सिस्टम**

लंदन में 1609 में पहली बार न्यू रिवर कंपनी ने लकड़ी की पाइपों से पानी सप्लाई करना शुरू किया। अमीर घरों तक नल और पाइप से पानी पहुंचने लगा। फिलाडेल्फिया में १८०१ में पहला मॉडर्न म्युनिसिपल वॉटर सप्लाई सिस्टम तैयार किया गया । जहां शहर के नागरिकों के लिए संगठित पाइपलाइन नेटवर्क बनाया गया । १८०० के दशक में नेपोलियन के आदेश पर यहां भी आधुनिक वॉटर पाइपलाइन सिस्टम बना।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. योगेश मुंदडे
संचालक : खा.शि. मंडळ, अमळनेर



श्री. समाधान धनगर
संचालक : बाजार समिती, अमळनेर



श्री. चंद्रकांत महाजन
सोने-चांदीचे व्यापारी, अमळनेर



डॉ. श्री. मनेष पाटील
अमळनेर



श्री. मिला पहेलवान
सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर



श्री. प्रा. शरद बिऱ्हाडे
फैजपूर

# सोनाली बेंद्रे ५१व्या वर्षीही दिसते अतिसुंदर

## फिट राहण्यासाठी जेवणासंदर्भातील 'ती' सवय सांगत म्हणाली...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेत्री सोनाली बेंद्रे ५१ वर्षांची झाली आहे. पन्नाशीतही तरुण अभिनेत्रींना लाजवेल, असे सोनालीचे सौंदर्य आहे. सोनालीला २०१८ मध्ये चौथ्या टप्प्याचा कर्करोग झाला होता. तिने कर्करोगावर न्यूयॉर्कमध्ये उपचार घेतले. २०२१ मध्ये ती पूर्णपणे बरी झाली. तेव्हापासून ती या आजाराबद्दल जागरूकता पसरवत आहे.

कर्करोगावर मात केल्यावर सोनाली बेंद्रे महिलांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचा सल्ला देते. २०२५च्या सुरुवातीला फराह खानशी बोलताना सोनाली बेंद्रेने एका महत्त्वाच्या सवयीबद्दल सांगितले होते. फराह खान व तिच्या घरी स्वयंपाक बनवणारा दिलीप हे दोघेही बहल कुटुंबाच्या घरी गेले होते. व्हिडीओत सोनाली आणि तिच्या सासूबाई मधू रमेश बहल यांनी एकत्र जेवण बनवले होते. सोनाली आणि तिच्या सासूने गंमतीत तक्रार केली होती, की फराह त्यांच्या घरी फार येत नाही. त्यावर फराहने म्हटले की सायंकाळी आठ वाजल्यानंतर ती प्रवास करणे टाळते. फराह खान जेवणाची वेळ काटेकोरपणे पाळते, त्यामुळे ती रात्री बाहेर जात नाही.

किती वाजता जेवते सोनाली बेंद्रे ?

मला फार उशीरा जेवायला आवडत नाही. मी सायंकाळी साडेसहा किंवा ७ वाजेपर्यंत जेवण करते. मग जेव्हा इतर लोक जेवत असतात, तेव्हा मला त्यांच्याबरोबर बसावे लागते. ही गोष्ट मला खूप थकवणारी वाटते. असे सोनाली बेंद्रे म्हणाली होती. सोनाली बेंद्रेने नंतर तिच्या माहेरी व सासरी जेवणाच्या वेगवेगळ्या सवर्चीबद्दल गप्पा मारल्या. मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबात वाढलेल्या सोनालीचे पंजाबी कुटुंबात लग्न झाल्यावर तिला रोजचे जेवण एखाद्या लग्नात जेवत असल्यासारखे वाटायचे. मात्र, आता तिने आरोग्य आणि फिटनेसशी कोणतीही तडजोड न करता, स्वतःला त्या वातावरणात जुळवून घेतले आहे.

'न्यूट्रिएंट्स' जर्नलच्या जुलै २०२१ च्या अंकात प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, रात्री उशिरा जेवण केल्याने ग्लुकोज मेटाबॉलिझमसह इतर चयापचय विकारांचा धोका वाढतो. रात्रीचे जेवण लवकर केल्याचे खूप फायदे आहेत. खासकरून लठ्ठ लोकांना सायंकाळी लवकर जेवणाचा सल्ला दिला जातो. लवकर जेवल्याने ब्लड ग्लुकोज, इन्सुलिन सेन्सेटिव्हिटी, रक्तदाब आणि ट्रायग्लिसराइड्ससारख्या समस्यांमध्ये फायदा होतो.

# अमळनेरला आज रंगणार 'पोलीस– पत्रकार महोत्सव'

## सांस्कृतिक मेजवानीसह मान्यवरांचा होणार सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, अमळनेर शहर व तालुका पत्रकार संघटना आणि व्हॉइस ऑफ मीडियातर्फे मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात 'पोलीस–पत्रकार महोत्सव' होणार आहे. यात क्रीडा, संस्कृती आणि पुरस्कारांचा त्रिवेणी संगम पाहावसाय मिळणार आहे. विविध स्पर्धा आणि कौटुंबिक आनंद पोलीस प्रशासन आणि पत्रकार बांधव यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी आणि त्यांच्या परिवारातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा महोत्सव होईल. यात निबंध आणि नृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः गृहिणींसाठी संगीत खूर्ची आणि लिंबू–चमचा यांसारख्या खेळांची मेजवानी मिळणार आहे.

दिग्गज मान्यवरांची मांदियाळी माजी केंद्रीय मंत्री ॲड. विजय नवल पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे अध्यक्षस्थानी असतील. पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, डॉ. बी. एस. पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, जिल्हाधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ. माहेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते व कविता नेरकर, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा आदी प्रमुख अतिथी असतील. गुणवंतांचा 'रत्न' पुरस्कारांनी सन्मान या सोहळ्यात समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येईल. यात 'अमळनेर भूषण', 'शिक्षण महर्षी', 'आदर्श देवस्थान', 'आरोग्य देवदूत', 'जीवनगौरव पत्रकारिता', आदर्श कर्मचारी, आदर्श युवा उद्योजक, आदर्श समाजसेवक,'आदर्श पोलीस कर्मचारी' आणि 'आदर्श सरपंच' आदींसह विविध श्रेणीतील पुरस्कारांचे वितरण केले जाईल. खानदेशी कलाकारांचा रंगारंग आविष्कार कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे खानदेशातील नामांकित कलाकारांची उपस्थिती लाभणार आहे. यात पुष्पा ठाकूर, संध्या अंभोरे, भय्या मोरे, गोविंद गायकवाड, जगदीश व शशांक संदानशिव, अल्ताफ राजा, रवी बॉडीगार्ड, आकाश पवार आणि राज दाभाडे आपल्या गायनाने आणि कलेने कार्यक्रमात रंगत भरतील. तसेच प्रसिद्ध कॉमेडियन विलासकुमार शिरसाट आपल्या विनोदी शैलीने उपस्थितांना खळखळून हसवतील. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून करण्यात आले आहे.

# ढगाळ वातावरणाने घाटेअळीने पोखरला हरभरा

## शेतकरी संकटात; कृषी विभागाकडून मार्गदर्शनाची गरज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रब्बीचा हरभरा सध्या बहरावर ते घाटे पक्व होण्याच्या स्थितीत आहे. मात्र, सद्यस्थितीत ढगाळ वातावरणामुळे घाटेअळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. हरभऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. शेतकरी पुन्हा संकटात सापडले असून, कृषी विभागाकडून मार्गदर्शनाची गरज आहे.

सध्याचे ऊबदार व ढगाळ वातावरण हे किडीसाठी पोषक आहे. हरभऱ्यावर घाटे अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. हरभऱ्याचे सर्वाधिक नुकसान या किडीमुळे होते. पीक फुलोऱ्यापासून ते काढणीपर्यंत घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. ही एक बहुभक्षी कीड आहे. हरभरा पिकासोबतच कापूस, ज्वारी, मका, टोमॅटो, घास, तूर आणि इतर कडधान्य पिकांवरदेखील या किडीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होतो. घाटेअळी ही हरभरा पिकाची प्रमुख कीड मानली जाते. अळी पानावरील हरित द्रव्य खरडून खाते. त्यामुळे पाने प्रथम पिवळसर पांढरी होऊन वाळतात. मोठ्या अळ्या संपूर्ण पाने व देठे खाऊन फस्त करतात. त्यामुळे झाडावर फक्त फांद्याच शिल्लक राहतात. पीक फुलोऱ्यावर आल्यावर अळीचा प्रादुर्भाव वाढतो. घाट्याला छिद्र करून आतील दाणे खाऊन अळी घाटे पोखरते. त्यामुळे एकात्मिक व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचे कृषी विभागाने सांगितले

### घाट्यांचे प्रमाण होते कमी

लहान अळ्या सुरुवातीस पानांच्या खालील बाजू खरवडून खातात. त्यामुळे पानांवर पांढरट डाग दिसून येतात. प्रादुर्भाव जास्त असल्यास पानांची जाळी झालेली दिसते. अळ्या झाडांचे कोवळे शेंडेदेखील कुरतडून खातात. त्यामुळे शेंडे पाने विरहित होतात. पिकास आलेल्या कळ्या व फुलेदेखील अळ्या कुरतडून खातात. परिणामी घाटे कमी प्रमाणात तयार होतात.

### अळी खादाड, दाणे करते फस्त

पूर्ण वाढ झालेली अळी अतिशय खादाड असते. अळी घाट्यात डोके खुपसून आतील दाणे फस्त करते. त्यामुळे घाट्यावर गोलाकार छिद्रे दिसून येतात. घाटे पक्व होण्याच्या कालावधीतील उघाड वातावरण किडीच्या वाढीस अतिशय पोषक असल्यामुळे अल्पावधीतच किडीची संख्या झपाट्याने वाढू शकते.

वाचा!
दै. ग्लोबल महातेज
आपला अंक आजच बुक करा...!

# ज्येष्ठ नागरिकांसाठी 'आई–बाबा सेवा उपक्रम'

## नगरसेविका सौ. कल्पना शर्मा आणि परिवाराची सामाजिक बांधिलकी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : येथील नगरसेविका सौ. कल्पना शर्मा यांच्या पुढाकारातून महाराणा प्रताप मित्र मंडळ व मुन्ना शर्मा यांच्या परिवाराने प्रभाग ९मधील व शहरातील सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी "आईबाबा सेवा" उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय मदत, आपत्कालीन सेवा, घरगुती तसेच वैयक्तिक अडचणींमध्ये तात्काळ सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. नववर्ष २०२६ मधील ज्येष्ठ नागरिकांसाठी ही अनोखी भेट आहे. शिक्षण किंवा नोकरीनिमित्त अनेक मुले– मुली बाहेरगावी वास्तव्यास असतात. त्यामुळे घरी एकटे राहणाऱ्या आई–बाबांसाठी हा विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत रात्री– अपरात्री कोणत्याही वेळी मदतीची गरज भासल्यास कार्यकर्ते तत्काळ हजर राहतील. आई– बाबांची सुरक्षितता, सन्मान व मानसिक आधार जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आहे, असे नगरसेविका सौ. कल्पना शर्मा यांनी सांगितले. या सेवेसाठी मुन्ना शर्मा (9422619626) व प्रसाद शर्मा (9422982082) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराणा प्रताप मित्र मंडळाचे सर्व कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी आहेत. या उपक्रमाचे प्रभाग ९मधील नागरिकांनी स्वागत केले आहे.

# गांधलीत सायंकाळी सात ते दहा मोबाईल राहणार बंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**ग्रामविकास मंचचा अभिनव उपक्रम**

अमळनेर : तालुक्यातील गांधली गावात आता दररोज सायंकाळी सात ते रात्री दहा वाजेपर्यंत मोबाईल बंद राहणार आहे. ग्रामविकास मंचच्या पुढाकाराने हा विधायक उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अनोख्या उपक्रमाचे तालुक्यातून स्वागत होत आहे. गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा तसेच घरातील व्यक्तींसोबत गप्पांमध्ये वेळ घालवावा. जेणेकरून सोशल मीडियाच्या मृगजळापासून दूर राहता यावे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाची संकल्पना प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील यांनी मांडली आहे. यासाठी आता सायरनही बसविण्यात आला आहे. बालाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व कर्मचारी यांच्या मदतीने विद्यार्थ्यांना ही संकल्पना समजावून देण्यात आली. या कामात मराठी शाळेलाही अंतर्भूत करण्याचे ठरविण्यात आले. मुख्याध्यापिका पाटील यांनीही यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. गावात स्टिकर लावून सुरूवात करण्यात आली आहे.

गटविकास अधिकारी पाटील यांनी सांगितले, की प्रकल्पाच्या यश– अपयशाचा विचार न करता जास्तीत जास्त सदस्यांनी अंमलबजावणी करावी. जेणेकरून ही संकल्पना एक सामाजिक चळवळ म्हणून पुढे यावी. सध्या २५ टक्के विद्यार्थ्यांनी जरी याचा विचार केला तरी गावातील १०० विद्यार्थी म्हणजेच १०० घरांमध्ये ही संकल्पना राबवणे हे देखील मोठे यश आहे.

प्राचार्य डॉ. पाटील यांनी उपक्रमाविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी बालाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक काटे , मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा पाटील, ग्रामपंचायत अधिकारी प्रमोद रामकृष्ण पाटील, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य व दोन्ही शाळांचे शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. आशिष शिंदे यांनी प्रास्ताविक केले. गांधलीचे सरपंच नरेंद्र पाटील यांनी आभार मानले.

# शहीद क्रांतीकारकांच्या परिवाराचा धार येथे रविवारी सन्मान सोहळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राष्ट्रजागर अभियानांतर्गत हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीतर्फे रविवार, दि. ११ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता तालुक्यातील धार येथे शहीद क्रांतीकारक परिवार सन्मान सोहळाह होणार आहे. तत्पूर्वी शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी रात्री ८ ते १० एक दिवसीय शिवपुराण कथा होईल. श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथील प. पू. महामंडलेश्वर स्वामी देवेश्वर तिर्थजी कथा निरूपण कररतील. शनिवार, दि. १० जानेवारी रोजी रात्री ८ ते १० रामायण कथासार होईल. बाराबंकीकर परमादर्श वेदआचार्य १००८ महामंडलेश्वर स्वामी हंसानंद तिर्थजी कथा निरूपण करतील.

### हे आहेत सन्मानार्थी

संत तुकाराम महाराज यांचे वंशज ह. भ. प. अशोक महाराज (देहू), शहीद सुखदेव यांचे वंशज अशोकजी थापर, शहीद भगतसिंह यांचे वंशज यादवेंद्रसिंहजी संधू, शहीद राजगुरु यांचे वंशज प्रशांतजी राजगुरू, लोकमान्य टिळकांचे वंशज कुणालजी टिळक यांचा सन्मान होईल. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीचे कमलेश कुलकर्णी, शशिकांत पाटील, गिरीश पाटील, कुलदीप खोरे, कुशल परदेशी व आनंद चव्हाण यांनी केले आहे.




# बंद पथदिव्याची तक्रार करा आता मोबाईलवर

## अमळनेर पालिकेचा निर्णय; नागरिकांकडून स्वागत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेने नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सार्वजनिक सुविधांचा दर्जा उंचावा यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शहरातील बंद, नादुरुस्त पथदिव्यांबाबत तक्रार नोंदविण्यासाठी मोबाईल सेवा सुरू केली आहे. पालिकेच्या या निर्णयाचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.

या सुविधेमुळे नागरिकांना पथदिव्यांच्या समस्यांसाठी पालिका कार्यालयात प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही. पथदिवे बंद असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी (९२२६४०४०११) या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पालिकेने केले आहे. सकाळी ९. ३० ते सायंकाळी ६. ३० या वेळेत मोबाईलवर तक्रार नोंदविता येईल. तसेच कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त किंवा सुट्टीच्या दिवशी नागरिकांना याच क्रमांकावर व्हॉट्सॲप किंवा एसएमएसद्वारेही तक्रार नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शहरातील पथदिवे सुरळीत राहिल्यास रात्रीच्या वेळी होणारे अपघात, चोरी व अन्य अनुचित घटनांना आळा बसणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालिकेने केले आहे.



# रा. काँ. पदाधिकाऱ्यांसह सुमारे दीडशे जणांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

## शिरीषदादा चौधरींच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याची पोलीसांत तक्रार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या कार्यालयातील कर्मचारी सचिन चौधरी (रा. जळोद) यांनी रा. काँ. चे काही पदाधिकारी व १०० ते १५० जणांविरूद्ध दंगलीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे. याबाबत रविवार, दि. ४ जानेवारी रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे.

सचिन चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, की मी माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या संपर्क कार्यालयात नोकरी करतो. त्यांच्या कार्यालयाची देखभाल करतो. शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी दुपारी सुमारे साडेतीन ते चार वाजेच्या दरम्यान मी कार्यकर्त्यांसह बसलेले होतो. याप्रसंगी संशयित आरोपी भूषण संजय भदाणे (रा. आर. के. नगर, अमळनेर), गौरव उदय पाटरील (रा. समर्थ नगर, अमळनेर), जितेंद्र गुलाबराव पाटील (रा. जिराडी– इंधवे), सुनील आर. शिंपी (रा. पिंपळे गल्ली, अमळनेर), मनिष पाटील (रा. गोपाल चौक, अमळनेर) व १०० ते १५० अनोखळी व्यक्ती हातात दगड, लाठ्या– काठ्या घेऊन कार्यालयाजवळ आले. आम्ही सर्व बसलेले कार्यकर्ते व कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला करण्याच्या उद्देशाने हल्ला केला. आई– बहिणींवरून वारंवार अश्लिल भाषेत शिविगाळ केली. कार्यालयावर दगडफेक केली. एवढेच नव्हे तर कार्यालयावरील दरवाजे व खिडक्या यावर दगडफेक करून वस्तूंची नासधूस केली. कर्मचारी व कार्यकर्त्यांना जीवेठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी अमळनेर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने आमचा बचाव केला. त्यानंतर सर्व संशयित आरोपींनी तेथून पळ काढला. आमच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला होता. हल्ला केल्याचे व्हिडिओ क्लिप संबंधित दस्तावेज तक्रारी सोबत जोडले आहेत. त्यामुळे संशयित आरोपींवर ३२४ (४), ३३३, १९० (२), १९१ (२), १९० व ८९ भारतीय न्याय संहितेखाली गुन्हा दाखल करावा. कायदेशीर कारवाई करावी, असेही तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीच्या प्रती पोलीस उपअधीक्षक व पोलीस अधीक्षकांनाही रवाना करण्यात आल्या आहेत.

मात्र याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला नसल्याचे सुत्रांकडून कळते.





अंगारकी चतुर्थी विशेष

# अंगारकी चतुर्थीची रंजक कथा

मंगळवारची संकष्टी चतुर्थी ‘ अंगारकी ’ म्हणून का संबोधिली जाते याबाबतची उपयुक्त माहिती जाणून घ्या. आपल्या हिंदू धर्मातील सहसा सर्व गणेशभक्त संकष्टी चतुर्थीच्या दिवशी उपवास धरतात. आपापल्या घरी सायंकाळी देव्हाऱ्यातील मंगलमूर्ती श्रीगणेश यांची पूजा करून बाप्पांना दुर्वा आणि मोदक अर्पण केले जातात. आणि चंद्रोदयानंतर मात्र गणपती श्लोक वाचून मगच हा उपवास सोडला जातो. परंतु हीच संकष्टी जेव्हा मंगळवारी येते तेव्हा तिला अंगारकी चतुर्थी म्हणून संबोधिले जाते. यामागची कथाही तितकीच रंजक आहे.

कृतयुगात अवंती नगरीत वेदवेत्ते अग्निहोत्री ऋषी भरद्वाज हे महान गणेशभक्त असून, त्यांनी त्या युगापासूनच मानवसृष्टीला गणेशपूजेचे महत्त्व पटवून दिले होते. या ऋषींकडूनच पृथ्वीच्या गर्भातून अंकारक नामक जास्वंदी वृक्षाच्या सान्निध्यात रक्तवर्णीय भौमपुत्र जन्माला आला होता. जो सात वर्षांचा झाल्यावर पृथ्वीने त्याला पुन्हा भरद्वाज ऋषींच्या स्वाधीन केले होते. ऋषींनी त्याचे उपनयन केले, वेद शिकविले आणि गणेशमंत्र देऊन उपासना करायला सांगितले. त्यानंतर हा मुलगा अरण्यात गेला. त्याने एक सहस्त्र वर्षे तप करून श्रीगणेश यांना प्रसन्न करून घेतले. आणि हाच तो दिवस होता मंगळवारी आलेल्या संकष्टी चतुर्थीचा.
‘ स्वर्गात राहून अमृतप्राशन करायचा आणि त्रैलोक्यात विख्यात व्हायाचे वरदान ’ त्याने प्रसन्न झालेल्या श्रीगणेश यांच्याकडे मागितला. यावर श्रीगणेश यांनी सुद्धा आपल्या परम भक्ताला हे वरदान दिले, की “ यापुढे भविष्यात येणाऱ्या मंगळवारची संकष्टी चतुर्थी ही तुझ्याच अंकारीका या नावाने ओळखली जाऊन संबंधित उपासकास २१ संकष्टी केल्याची फलप्राप्ती या चतुर्थीमुळे मिळेल. तुझ्या या सहस्रवर्षाच्या तपश्चर्येचे पुण्य युगानुयुगे त्यांच्यातही वाटले जाऊन त्यांच्या इच्छित मनोकामना पूर्ण होतील. ते ऋणमुक्त होतील. ”
“ अशाप्रकारे त्रैलोक्यात तू सुविख्यात होशील आणि तुझे नाव भूमिपुत्र म्हणून भौम, अकारकासारखा लाल आहेस म्हणून अंकाकर व शुभ करण्याची शक्ती असेल म्हणून मंगळ या नावे तुला ब्रह्मांडातील आकाशात ग्रहांमध्ये स्थान मिळेल व तू सदैव अमृतपान करशील. ” त्यामुळेच श्रीगणेश यांच्या याा वरदानामुळे तेव्हापासून अंगारकी चतुर्थीला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच ज्या गणेशभक्तांना प्रतिमासी येणाऱ्या संकष्टी चतुर्थीचे व्रत/उपवास करणे जमत नसल्यास अशांनी अंगारकी मात्र न विसरता व न चुकता आवर्जून करावी की ज्यामुळे २१ संकष्टी केल्याची फलश्रुती नक्कीच लाभणार, असे वेदवचनही दिले गेले आहे. म्हणूनच आजची मंगळवारी येणारी संकष्टी चतुर्थी ही या वर्षातील पहिली-वहिली अंगारकी योग असल्याने आपल्याही काही मनोकामना पूर्ण होण्यासाठी अथवा अडकलेले महत्त्वाचे ईप्सित कामे मार्गी लागण्यासाठी इच्छुकांनी आज अंगारकी मात्र अवश्य धरावी. कारण आज ब्रह्मांडातील श्री मंगळग्रहाच्या पुण्य लहरी कैक सहस्रपटीने पृथ्वीकडे आकर्षित होत असतात. त्यामुळे कुणीही उद्याची चतुर्थी धरणाऱ्यास त्या पुण्यलहरींचा त्याला निश्चितच फायदा होतो, हे मी स्वानुभवाने सांगतो. या दिवशी मात्र खालील श्लोक म्हणून चंद्रदर्शन करूनच उपवास सोडावा. तसेच हेही ध्यानात असू द्यावे, की कुणाच्याही सांगण्यावरून व स्वतःच्या मनाने कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण दिवसाचा अखंड उपवास धरून दुसऱ्या दिवशी उपवास सोडण्याची पद्धत मात्र अवलंबू नये. कारण मुळातच बाप्पाला भूक अनावर होत असल्याने त्यांना त्यांचे भक्तगण उपाशीपोटी झोपलेले कदापि रुचत नाही. म्हणून त्यांच्याच आदेशानुसार चतुर्थीला चंद्रदर्शन करून उपवास सोडणे केव्हाही श्रेयस्कर आणि फलप्राप्ती निश्चितच.

**गणेश अंगारकी श्लोक**
**गणेशाय नमस्तुभ्यं,**
**सर्व सिद्धि प्रदायक ।**
**संकष्ट हरमे देवं,**
**गृहाणार्घ्यम् नमोऽस्तुते ॥**
**कृष्णपक्षे चतुर्थ्यातु , सम्पूजितं**
**विधूदये। क्षिप्रं प्रसीद देवेश,**
**अंगारकाय नमोऽस्तुते ॥**



### अंगारकी चतुर्थी सुरू होण्याची माहिती

मुद्गल पुराण तसेच गणेश पुराण या ग्रंथात दिलेल्या कथेनुसार अंगारक या भारद्वाज ऋषी पुत्राने कठोर तप करून गणपतीला प्रसन्न करून घेतले. गणपती बाप्पांनी मंगळ (अंगारक) याला वर दिला होता की तुझे नाव ‘ अंगारक ’ हे लोकस्मरणात राहील. हा प्रसन्न होण्याचा दिवस चतुर्थीचा होता. या कथेनुसार अंगारकी चतुर्थीचे व्रत केल्यास कोणतेही संकट येत नाही अथवा संकट आल्यास त्याचे निवारण होते. कथेत आलेला अंगारक म्हणजेच आकाशात दिसणारा मंगळ ग्रह होय, असे मानले जाते. श्रीगणेश यांनी मंगळाला वर दिला आणि तुझ्या नावाची ही चतुर्थी लोकांचे कल्याण करणारी होईल, असा वर दिला. त्या दिवसापासून अंगारकी चतुर्थी या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले, असे मानले जाते. नंतर मंगळाने गणपती बाप्पांचे एक मंदिर बांधले आणि तेथे गणपती बाप्पांची मूर्ती स्थापन केली. या मूर्तीला ‘ मंगलमूर्ती ’असे नाव मिळाले.

# अंगारक योग म्हणजे काय ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अंगारक योग म्हणजे ज्योतिषशास्त्रानुसार कुंडलीमध्ये मंगळ किंवा राहू किंवा केतू एकत्र आल्यास किंवा त्यांची दृष्टी पडल्यास तयार होणारा एक विशेष योग आहे.
जो व्यक्तीच्या जीवनात आक्रमकता, क्रोध, ऊर्जा आणि कधी-कधी अशुभ परिणाम (जसे की अपघात, वाद, अस्थिरता) आणू शकतो. परंतु योग्य भाव आणि ग्रहांच्या बळानुसार त्याचे फळ चांगले-वाईट असू शकते. हा योग मंगळाच्या आक्रमक उर्जेला राहूच्या विस्ताराची जोड देतो.

**अंगारक योग कसा तयार होतो ?**
- जेव्हा मंगळ आणि राहू किंवा केतू हे ग्रह कुंडलीच्या कोणत्याही स्थानात एकत्र येतात तेव्हा अंगारक योग तयार होतो.
- या ग्रहांची दृष्टी जरी पडली तरी हा योग बनू शकतो.

**अंगारक योगाचे परिणाम**
नकारात्मक : क्रोध वाढणे, त्वचेचे रोग, अपघात, अस्थिर मन, भांडणे, रक्त संबंधित समस्या, निर्णय घेण्यास अडचण.
सकारात्मक (मंगळ-राहू/केतू शुभ स्थानात असल्यास) : प्रचंड ऊर्जा, धाडस, नेतृत्व क्षमता, जिद्द, ज्यामुळे व्यक्ती यशस्वी होऊ शकते.

**अंगारक योगाचा प्रभाव कसा कमी करावा ?**
- क्रोध आणि भावनांवर नियंत्रण ठेवणे.
- मंगळ आणि राहू-केतू शांत करण्यासाठी पूजा किंवा उपाय करणे (उदा.- नदीत कच्चा कोळसा प्रवाहित करणे.)

**अंगारकी चतुर्थीशी संबंध**
- ‘ अंगारक ’ म्हणजे मंगळ. ज्या दिवशी चतुर्थी मंगळवारी येते त्याला ‘ अंगारकी चतुर्थी ’ म्हणतात. ही गणपती बाप्पांची एक विशेष तिथी मानली जाते. जेथे अंगारक योगाशी संबंधित ऊर्जा गणपती बाप्पांच्या पूजनाने सकारात्मक केली जाते.

# अंगारक चतुर्थीला दुर्वांचे हे ६ प्रभावी उपाय करा

## ६ मोठ्या समस्यांमधून होईल सुटका

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अंगारक संकष्ट चतुर्थीचे व्रत आणि विधीवत पूजा तसेच प्रार्थना करणे अत्यंत फलदायी ठरते, असे म्हणतात. गणपती बाप्पांना प्रिय असलेल्या गोष्टी अर्पण केल्याने ते लवकर प्रसन्न होतात, अशी श्रद्धा आहे.

**दुर्वांचे महत्त्व व उपाय केल्यास कोणते लाभ मिळतात ?**
श्रीगणेशांचे पूजन दुर्वांशिवाय अपूर्ण मानले जाते. गृहप्रवेश, मुंज, विवाह, बुधवार आणि संकष्ट चतुर्थीसह सर्व शुभ कार्यांमध्ये दुर्वांचा उपयोग केला जातो. आपण गवताला दुर्वा म्हणत नाही, तर त्रिदलयुक्त दुर्वा निवडून आपण ती श्रीगणेश देवतेला अर्पण करतो. यामागचा भावार्थ असा, की पूजेमध्ये मन पूर्ण एकाग्र व्हावे. मन शांत झाले की मार्ग आपोआप मोकळे होतात आणि चमत्कार घडतात.



**संकष्ट चतुर्थीच्या दिवशी दुर्वांचे करा हे ६ उपाय**
१) आर्थिक संकट निवारणासाठी उपाय
पाच दुर्वा घेऊन दोऱ्याला ११ गाठी घालून छोटा हार तयार करा आणि बाप्पांना अर्पण करा.
लाभ : आर्थिक अडचणींमधून लवकर सुटका होते.

२) मनोकामना पूर्तीसाठी उपाय
गायीच्या दुधात दुर्वा मिसळून त्यापासून तयार झालेले गंध कपाळाला लावा.
लाभ : इच्छा लवकर पूर्ण होते.

**३) घरातील संकट आणि कलह**
निवारणासाठी उपाय
दररोज गायीला चारा आणि दुर्वा खाऊ घाला.
लाभ : कौटुंबिक नात्यांत प्रेम, शांतता वाढते.

**४) श्रीगणेशकृपा प्राप्तीसाठी उपाय**
संकष्ट चतुर्थीला बाप्पांना २१ दुर्वांचे त्रिदल अर्पण करा. सोबत अथर्वशीर्षाची २१ आवर्तने म्हणा किंवा ऐका.
लाभ : श्रीगणेश देवतेची कृपा होईल.

**५) धनवृद्धीसाठी उपाय**
श्रीगणेश पूजेत नियमित दुर्वा अर्पण केल्याने आर्थिक कमतरता भासत नाही.
लाभ : उलट कामात यश आणि धनलाभ होतो, असे शास्त्र सांगते.

**६) बुध दोष शांतीसाठी उपाय**
बुधवारी किंवा चतुर्थीला श्रीगणेश मंदिरात ११ दुर्वांच्या जुडी अर्पण करा.
लाभ : बुध दोष कमी होतो आणि श्रीगणेश कृपा लाभते.

# अंगारक संकष्टीला चंद्रदेव जाणार सूर्याच्या राशीत

## ‘ या ’ चार राशींचे आयुष्य रातोरात बदलणार; जिकडे तिकडे पैशांचा पाऊस पडणार

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक त्याच्या ठराविक वेळेनंतर राशी परिवर्तन आणि नक्षत्र परिवर्तन करतो. ज्याचा शुभ-अशुभ प्रभाव मानवी जीवनावर पाहावयास मिळतो. ज्योतिषशास्त्रानुसार चंद्र एकमेव असा ग्रह आहे जो सर्वांत वेगवान गतीने एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो. तो एका राशीमध्ये जवळपास अडीच दिवस राहतो. त्यामुळे बऱ्याचदा काही राशींमध्ये चंद्राची दुसऱ्या ग्रहाबरोबर युती निर्माण होते. या युतीचा काही राशींच्या व्यक्तींवर शुभ, तर काही राशींवर अशुभ परिणाम पाहावयास मिळतो.

पंचांगानुसार चंद्र ६ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजून १७ मिनिटांनी सिंह राशीत प्रवेश करेल. योगायोगाने या दिवशी वर्षातील पहिली अंगारक संकष्टी आहे. चंद्राचे हे गोचर १२ पैकी काही राशींच्या व्यकींसाठी अत्यंत अनुकूल ठरेल.

**चंद्राचे राशी परिवर्तन करणार मालामाल**
तूळ : सिंह राशीतच चंद्राचा प्रवेश होणार आहे. त्यामुळे हे राशी परिवर्तन तूळ राशीसाठी खूप अनुकूल सिद्ध होईल. आर्थिक समस्या दूर होतील. या काळात अडकलेली कामे पूर्ण होतील. तुमचा आत्मविश्वास वाढेल. आयुष्यात सुख-समृद्धी वाढेल. कुटुंबीयांसोबत प्रवास घडेल. नोकरीत पदोन्नती मिळण्याची दाट शक्यता आहे. आर्थिक परिस्थिती उत्तम राहील आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. नव्या नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना नवी संधी मिळेल.

**कुंभ**



कुंभ राशीच्या व्यक्तींसाठी चंद्राचा सिंह राशीतील प्रवेश खूप लाभदायी सिद्ध होईल. हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक सिद्ध होईल. आत्मविश्वासात वाढ होईल. आनंदी वार्ता कानी पडतील. समाजात मानसन्मान वाढेल. या काळात आर्थिक परिस्थिती उत्तम राहील. कुटुंबात शुभ कार्ये होतील. आरोग्याच्या तक्रारी बंद होतील. परदेशात जाण्याचे योग आहेत. मानसिक तणावातून मुक्त व्हाल. वैवाहिक जीवन सुखमय असेल.

**कर्क**



चंद्राचा सिंह राशीतील प्रवेश कर्क राशीसाठी खूप अनुकूल सिद्ध होईल. या काळात तुमच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील. गुंतवणूक करणे फायदेशीर ठरेल. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांनाही यशाचे गोड फळ लाभेल. फक्त मेहनत कायम ठेवा. अविवाहितांसाठी लग्नाचे अनेक प्रस्ताव येतील. नोकरी करणाऱ्यांना कामात सकारात्मक बदल दिसून येतील.

**सिंह**



सिंह राशीच्या व्यक्तींसाठी चंद्राचे गोचर खूपच अनुकूल सिद्ध होईल. या काळात तुमच्या मनातील सर्व मनोकामना पूर्ण होतील. आयुष्यातील ध्येय साध्य करण्यासाठी खूप कष्ट घ्याल. कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. वैवाहिक जीवन सुखमय राहील. या काळात खूप सकारात्मक विचार कराल. आयुष्यातील नवे बदल स्वीकारण्यास तयार व्हा. सगळीकडे तुमचे वर्चस्व असेल. फक्त मेहनत कायम ठेवा.



# रत्नागिरीतील १८ हातांचे वीर विघ्नेश मंदिर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

कोकणातील गणपती मंदिर म्हटले तर सर्वप्रथम आठवण होते ती गणपती पुळे येथील मंदिराची. तेथील स्वयंभू गणपतीबाप्पा आणि सभोवतालचा निसर्गरम्य परिसर अनुभवण्यासाठी पर्यटकांची पावले तेथे सहजपणे वळणे साहजिकच आहे. मात्र कोकणात हेच एकमेव गणपतींबाप्पांचे स्थान नसून असे अनेक ठिकाणी गणपती बाप्पा भक्तांना दर्शन देत असल्याचे दिसून येते. त्यात काही देवस्थाने प्रसिद्ध, काही अप्रसिद्ध तर काही अजूनही दुर्लक्षितच आहेत.

यापैकी गणपतीपुळेसह आंजर्ले येथील कड्यावरचा गणपती, टिळक आळी येथील गणपत आणि गणेशगुळे येथील गणपती मंदिरे अनेक भाविकांची मोठी श्रद्धास्थाने आहेत. जेथे भाविक दर्शनासाठी नेहमीच गर्दी करीत असतात.

रत्नागिरीतील वीर विघ्नेश हे अठरा हातांचे गणपती मंदिर सर्वत्र प्रसिद्ध आहे. असे सांगितले जाते, की महाराष्ट्रात १८ हात असलेली ही एकमेव श्रीगणेशांची मूर्ती आहे.
रत्नागिरी बसस्थानकापासून पायी गेल्यास पाच मिनिटांच्या अंतरावर हे मंदिर आहे. जोशी कुटुंबाचे हे खासगी मंदिर असले, तरी रत्नागिरीकरांचे ते श्रद्धास्थान आहे. येथील वीर विघ्नेशांची मूर्ती म्हणजे महालक्ष्मी व गणपती यांचे एकत्रित रूप आहे. त्यामुळे महालक्ष्मींचे १६ हात व श्रीगणेशांचे चार हात असे मिळून २० हात या मूर्तीला आहेत. परंतु या दोघांचे दोन हात एकत्रच असल्यामुळे ते दिसत नाहीत. म्हणून हे श्रीगणेश १८ हातांचे गणपती म्हणून प्रसिद्ध आहेत.
१९६७ मध्ये ज्येष्ठ वद्य अष्टमीला येथील विनायक कृष्ण जोशी या श्रीगणेशभक्ताने जयपूरहून ही मूर्ती एक हजार रुपयांत बनवून आणली व घरालगत मंदिर बांधून त्यात या मूर्तीची प्रतिष्ठापना केली होती. मंदिराच्या गर्भगृहात चांदीच्या मखरात वीर विघ्नेशांची मूर्ती आहे. मूर्तीची सोंड सरळ खाली आलेली असून, खालचा भाग उजवीकडे वळलेला आहे. शुभ्र संगमरवरी असलेल्या या मूर्तीमध्ये १८ हात स्पष्ट दिसतात. मूर्तीच्या खाली मूषक व सिंहासनाच्या दोन्ही बाजूंना सिंह आहेत. या मंदिरातील मोठा उत्सव मार्गशीर्षात होतो. मार्गशीर्ष विनायकी चतुर्थीला दुपारी १२.३९ वाजता गजाननाला पाळण्यात घालून हा उत्सव साजरा केला जातो. यावेळी एक हजार तळणीचे (तळलेले) मोदक, एक हजार दुर्वा, एक हजार शमी, एक हजार तीळ व एक हजार तांदूळ गणपतीबाप्पांना अर्पण करून एक हजार आवर्तने केली जातात.
असे सांगितले जाते, की अष्टमहासिद्धी प्राप्तीसाठी आठ रंगांमध्ये या गणपतीबाप्पांची मूर्ती करून मंदिरात अनुष्ठान केल्यास सिद्धी प्राप्त होतात. याशिवाय ब्रह्मविद्याप्राप्ती, भूतपिशाच्च बाधा निरसन आणि वंशवृद्धीसाठी वीर विघ्नेशांची उपासना केल्यास फायदा होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)